MHPU180005292015

**रे.दि.मु.नं. ११७/२०१५**
सीएनआरनं.महापु.१८-०००५२९-२०१५

## निशाणी क्र.४९ खालील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी यांचे विरुध्द दिवाणी प्रक्रिया संहिता ऑर्डर १८ रुल १७ प्रमाणे दाखल केलेला आहे. वादी यांचे असे कथन आहे की, प्रस्तुतचा दावा वादी यांनी प्रतिवादी यांचेविरुध्द रक्कम रुपये ५२,०८३/– च्या वसुलीकरिता दाखल केलेला आहे. प्रस्तुत दाव्यात वादीने प्रतिवादींच्या उधारीचे बिल दाखल केलेले आहे. तसेच सा.क्र. २ म्हणून आजीम बाळूभाई सय्यद यांचा सरतपास दाखल केलेला आहे. परंतु सदर साक्षीदार वादीचे काम सोडून गेल्यामुळे त्यांना उलटतपास देण्याकरिता येता आले नाही. त्यामुळे कोर्टाने वादींचा पुरावा बंद केलेला आहे. त्यामुळे न्यायदानाच्या दृष्टीने वादीचा पुरावा बंद केलेला आदेश रद्द करण्याकरिता प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे.

प्रतिवादी प्रस्तुत अर्जापाठीमागे म्हणणे देवून वादींचा अर्ज व त्यातील कथने नाकारलेली आहेत. त्यांनी असे कथन केले आहे की, वादी यांना त्यांचा पुरावा देण्याकरिता ब–याच संधी देण्यात आलेल्या आहेत. वादींचा नि. ४५ कडे दिलेला अर्ज नामंजूर करण्यात आलेला आहे. त्यामुळे वादींना नव्याने तशी संधी देता येणार नाही. सबब त्यांनी अर्ज नामंजूर करण्याची त्यांनी विनंती केली.

२. वादीतर्फे विव्दान विधिज्ञ श्री. शितोळे यांनी असा युक्तीवाद केला की,

प्रस्तुतचा दावा वादींनी प्रतिवादी यांच्याविरुध्द त्यांनी उधार नेलेल्या खाताचे रक्कम रुपये ५२,०८३/- च्या वसुलीकरिता दाखल केलेला आहे. त्याकरिता सा.क्र. २ आजीम सययद यांचे शपथपत्र देखील नि. ४० कडे दाखल केलेले आहे. परंतु सदर साक्षीदार हा काम सोडून गेल्यामुळे उलटतपासात हजर राहता आले नाही. मा. कोर्टाने नि. १ कडे आदेश करुन दिनांक ३०/०७/२०१९ रोजी वादींचा पुरावा बंद केलेला आहे. तो आदेश रद्द होवून सदर साक्षीदार यांचा उलटतपास होणे आवश्यक आहे. त्यामुळे न्यायदानास मदतच होणार आहे. सबब अर्ज मंजूर करण्याची त्यांनी विनंती केली.

प्रतिवादीतर्फे विव्दान विधिज्ञ श्री. सोनवणे यांनी असा युक्तीवाद केला की, वादी यांचा पुरावा दिनांक ३०/०७/२०१९ रोजी पुरेश्या संधी देवून बंद करण्यात आलेला आहे. त्यांचा नि. ४५ कडील अर्ज देखील नामंजूर करण्यात आलेला आहे. त्यानंतर नि. ३२ प्रतिवादी यांनी त्यांच्या सरतपासाचे शपथपत्र दाखल केलेले असून त्यांचा उलटतपास दिनांक ७/१२/२०१७ रोजी झालेला आहे. त्यानंतर प्रतिवादी यांचादेखील नि. ४८ चा अर्ज नामंजूर करण्यात येवून त्यांचा पुरावादेखील बंद करण्यात आलेला आहे. त्यामुळे वादी यांना पुन्हा पुरावा सुरु करणेकामी संधी देणे न्यायोचित होणार नाही. सबब अर्ज नामंजूर करण्याची त्यांनी विनंती केली.

**३.** दोन्ही बाजूचा युक्तीवाद ऐकला व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. नि. २३ कडे दिनांक २५/१०/२०१६ रोजी मुद्दे काढण्यांत आलेले आहे. नि.

१२ सोबत वादीनी दिलेल्या सरतपासाच्या शपथपत्राप्रमाणे दिनांक २०/०७/२०१७ रोजी प्रतिवादीतर्फे त्यांचा उलटतपास घेण्यात आलेला आहे. त्यानंतर दिनांक २२/०८/२०१७ रोजी नि. ३१ कडे वादीतर्फे पुरावा बंद करण्याची पुरसिस दाखल करण्यात आली. त्यानंतर नि. ३२ कडे प्रतिवादीतर्फे साक्षीदार यांचे शपथपत्र दाखल करण्यात आले व वादीतर्फे दिनांक ०७/१२/२०१७ रोजी त्यांचा उलटतपास घेण्यात आला. प्रतिवादी यांनी दिनांक ०८/०३/२०१८ रोजी नि. ३४ कडे पुरावा बंद करण्याची पुरसिस दाखल केलेली आहे.

वादी यांनी नि. ३६ कडे कलम १५१ प्रमाणे साक्षीदार तपासण्यास परवानगी मिळणेकरिता दिनांक ०४/०६/२०१८ रोजी अर्ज देण्यात आला होता तो दिनांक २६/०६/२०१८ रोजी मंजूर करण्यात आला व वादीस दिलावर सय्यद यांना केवळ कागदपत्रे शाबीत करण्याकरिता तपासण्याची परवानगी देण्यात आली. त्यानंतर पुन्हा वादी यांनी नि. ३८ कडे दिनांक ०५/०९/२०१८ रोजी अर्ज देवून दिलावर सय्यद हे नाव चुकीने लिहिले असून त्याऐवजी विक्री बिलावत आजीम बाळूभाई सय्यद यांची सही असल्यामुळे त्यांना तपासण्याची परवानगी मागितली तो अर्ज दिनांक ०१/१०/२०१८ रोजी मंजूर करण्यात आला. त्यानंतर वादीतर्फे नि. ३९ कडे अर्ज देवून मुदत मागितली ती देखील मंजूर करण्यात आले. नि. ४० कडे वादीतर्फे आजीम बाळूभाई सय्यद यांचे सरतपासाचे शपथपत्र दिनांक २३/०१/२०१९ रोजी दाखल करण्यात आले होते. त्यानंतर दिनांक १२/०२/२०१९ रोजी नि. ४१ तर दिनांक

१४/०३/२०१९ रोजी नि. ४२ तसेच दिनांक ११/०४/२०१९ रोजी नि. ४३ कडे वादी यांनी मुदतीचे अर्ज दिलेले आहे. सदर अर्जांचे अवलोकन केले असता त्यामध्ये सदर साक्षीदार काम सोडून गेल्यामुळे हजर नाहीत असे कारण नमूद केल्याचे दिसून येत नाही. उलटपक्षी वादी यांनी वेगवेगळी कारणे नमूद केल्याचे दिसून येते. वादी यांना वेळोवेळी संधी देवून देखील वादी यांनी सदर साक्षीदार यांना उपस्थित ठेवले नाही. उलटपक्षी नि. ४५ कडे पुन्हा साक्षीदार यांना कामातून रजा न मिळाल्यामुळे उपस्थित राहू शकत नाही असे कारण देवून मुदतीचा अर्ज वादीतर्फे दिनांक ३०/०७/२०१९ रोजी देण्यात आला तो नामंजूर करण्यात आलेला आहे व त्यादिवशी नि. १ आदेश करुन वादींचा पुरावा बंद करण्यात आला. तसेच नि. ४८ कडील प्रतिवादी यांचा मुदतीचा अर्ज आल्यानंतर वादी यांनी त्यास प्रतिवादींचा पुरावा लवकर व्हावा असे म्हणणे दिल्याचे दिसते तो अर्ज देखील नामंजूर करुन प्रतिवादींचा पुरावा दिनांक ०७/११/२०१९ रोजी बंद करण्यात आलेला आहे.

**४.** वादी यांचा पुरावा नि. ३१ कडील पुरसिस प्रमाणे दिनांक २२/०८/२०१७ रोजी बंद केला असता देखील नि.३६ कडील अर्जाप्रमाणे त्यांना पुरावा देण्याची संधी देण्यात आली होती. त्यानंतर नि. ४१ ते ४३ कडील त्यांचे मुदतीचे अर्जदेखील मंजूर करुन त्यांना पुरेशी संधी देण्यात आली होती असे असताना देखील वादी यांनी सदर साक्षीदारांना उपस्थित ठेवण्याची कोणतीही तजवीज केलेली नाही. दिनांक ३०/०७/२०१९ रोजी त्यांचा पुरावा बंद करण्यात आला असताना

दिनांक २४/०२/२०२० रोजी प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे. प्रस्तुत अर्जास कोणतेही संयुक्तीक व सबळ कारण दिले नसल्याचे दिसून येते. वादी केवळ काम प्रलंबित करत असल्याचे दिसून येते. त्यामुळे वादींचा अर्ज नामंजूर होणे न्यायोचित होणार आहे. सबब वर नमूद सर्व कारणांस्तव खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

अर्ज नामंजूर करण्यात येतो.

ANIKET ARUN KALAMKAR Digitally signed by ANIKET ARUN KALAMKAR

दौंड **(ए.ए.कळमकर)**

दिनांक – १४.०२.२०२२ २रे सह दिवाणी न्यायालय दौंड,

जिल्हा पुणे

CERTIFIED

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment is same word for word as per original Judgment.

| | |
|---|---|
| Name of Steno | : D.R.Kore |
| Court Name | : A.A.Kalmkar |
| | : 2nd Joint Civil Judge, Jr.Dvn. Daund. |
| Date of Judgment | : 14-02-2022 |
| Judg. signed by P. O. | : 14-02-2022 |
| Uploaded on | : 15-02-2022 |